**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**
प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये दिलेल्या सवलतीनुसार प्रत्यक्ष रक्कम जमा करण्याची मुदत वाढविण्याबाबत **कलम १५४ अन्वये निदेश...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२०/अनौ.२७/प्र.क्र.८०/२०/नवि-१३,**
**दिनांक : ३१/१२/२०२१**

**वाचा : शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२०/अनौ.२७/प्र.क्र.८०/२०/नवि-१३, दि.१४/०१/२०२१**

**प्रस्तावना :-** शासनाने, प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार, नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रात तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रात अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी / फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्याबाबतीत ५०% सुट द्यावी. तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाव्यतिरिक्त नियोजन प्राधिकरणामार्फत तसेच इतर प्राधिकरणांमार्फत अन्य बाबींसाठी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये ५०% सूट देण्याबाबत नियोजन प्राधिकरणांनी / इतर प्राधिकरणांनी निर्णय घ्यावा याबाबत, याची अंमलबजावणी करण्याच्या कार्यपध्दतीसह, दि.१४.०१.२०२१ रोजीचे कलम १५४ खालील निदेश सर्व नियोजन प्राधिकरणे / इतर प्राधिकरणांना दिले आहेत. या निदेशांनुसार दि.३१.१२.२०२१ पर्यंत प्रत्यक्ष जमा करण्यात येणाऱ्या अधिमूल्याच्या रकमेवर सूट / सवलत अनुज्ञेय आहे. म्हणजेच जे विकास प्रस्ताव दि.३१.१२.२०२१ पूर्वी अथवा दि.३१.१२.२०२१ या रोजीपर्यंत मंजूर होतील व त्या अनुषंगाने प्रत्यक्ष अधिमूल्य दि.३१.१२.२०२१ रोजी जमा करण्यात येईल, अशा प्रस्तावांसाठीच सदर सूट / सवलत लागू आहे.

या मुदतीपर्यंत नियोजन प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर झालेले अथवा प्राप्त होणारे प्रस्ताव नियोजन प्राधिकरणाच्या स्तरावर छाननी व मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, अशा प्रस्तावांना दि.३१.१२.२०२१ रोजीपर्यंत जर नियोजन प्राधिकरणाकडील सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजूरी दिली, मात्र त्यानंतर अशा प्रस्तावांमध्ये तत्वत: दिलेल्या मंजूरीनुसार आवश्यक विकास शुल्क, अधिमूल्य रक्कम, इतर शुल्क इत्यादी जमा करण्यासाठी चलन देण्याची किंवा पत्र देण्याची कार्यवाही बाकी असेल म्हणजेच ज्या प्रस्तावांना सक्षम प्राधिकाऱ्यांनी दि.३१.१२.२०२१ अखेरपर्यंत मंजूरी दिली आहे, परंतु अशा प्रस्तावांमध्ये मंजूरीचे अनुषंगाने आवश्यक अधिमूल्य रक्कम जमा करण्यासाठी चलन देणे किंवा पत्र देणे आणि त्याप्रमाणेचे शुल्क प्रत्यक्ष दि.३१.१२.२०२१ रोजी जमा करुन घेणे व्यावहारीक दृष्ट्या शक्य होईल असे दिसून येत नसल्यामुळे प्रत्यक्ष रक्कम जमा करण्याची मुदत वाढवून देणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

सबब याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणे / नगर रचना विभागाची सर्व शाखा कार्यालये / सर्व जिल्हाधिकारी / इतर प्राधिकरणे यांना पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

" ***निदेश*** "

दि.१४.०१.२०२१ रोजीच्या निदेशानुसार अधिमूल्य सवलतीची अनुज्ञेयता निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार,

१. जे प्रस्ताव दि.३१.१२.२०२१ रोजी अथवा तत्पूर्वी सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर केले असतील परंतु प्रत्यक्षात अधिमूल्य दि.३१.१२.२०२१ रोजी जमा करता येऊ शकले नसेल अशा दि.३१.१२.२०२१ रोजी अथवा तत्पूर्वी मंजूर विकास प्रस्तावांना प्रत्यक्ष अधिमूल्य जमा करण्याची मुदत दि.१५.०१.२०२२ अखेरपर्यंत वाढविण्यात येत आहे.
२. दि.३१.१२.२०२१ नंतर ज्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात येईल, त्या प्रस्तावांना हे आदेश लागु राहणार नाहीत.

सदर निदेश लगोलग अंमलात येतील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

**(नोरेश्वर र. शेन्डे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सह सचिव तथा सहसंचालक (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना.
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व जिल्हाधिकारी.

५) आयुक्त, सर्व महानगरपालिका.

६) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

७) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

९) सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.

१०) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

१२) अवर सचिव, नवि-११ / नवि-३०, कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि-१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

१४) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचे **निदेश** या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

१५) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदरचे **निदेश** शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

१६) निवडनस्ती, कार्यासन (नवि-१३).

*******